



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०६ | अंक : ३६, पाने : ०५, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.१९ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, नागपूर :** महाराष्ट्रातील विविध भागांत निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने प्रशासनाला तातडीने प्रत्यक्ष शेतात जाऊन परिस्थितीचा आढावा घेण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत दुष्काळाच्या प्रश्नाला सर्वोच्च प्राधान्य दिले असून, शेतकरी आणि पिकांचे प्रत्यक्ष नुकसान जाणून घेण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात पत्रकारांशी संवाद साधताना ही माहिती दिली.



बावनकुळे म्हणाले की, राज्यातील १८ जिल्ह्यांचे प्राथमिक अहवाल सरकारला प्राप्त झाले आहेत. मात्र, शेतकऱ्यांना मदत जाहीर करण्यापूर्वी पिकांच्या प्रत्यक्ष नुकसानीचे सविस्तर मूल्यांकन केले जाणार आहे. सोयाबीन, कापूस, संत्री यासह अन्य प्रमुख पिकांचे किती नुकसान झाले आहे, याचा अंतिम अहवाल पुढील सात ते आठ दिवसांत अपेक्षित आहे.

शेतकऱ्यांना केवळ औपचारिक किंवा तात्पुरती मदत देण्याऐवजी भविष्यातील अडचणींवरही मात करता यावी, यासाठी व्यापक उपाययोजना करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. यापूर्वी लागू करण्यात आलेल्या शासन निर्णयांच्या धर्तीवर शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत विचार सुरू आहे. तसेच राज्यातील सर्व पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि आमदारांना आपल्या भागातील शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून परिस्थिती जाणून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. केवळ कार्यालयीन अहवालावर अवलंबून न राहता प्रत्यक्ष शेतात जाऊन पिकांची स्थिती तपासण्यावर सरकारचा भर असल्याचे बावनकुळे म्हणाले. आपण स्वतःही काही जिल्ह्यांचा दौरा करून परिस्थितीचा आढावा घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दुष्काळी परिस्थितीत जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्याचा प्रश्नही महत्त्वाचा ठरणार आहे. यापूर्वी चारा छावण्यांमध्ये झालेल्या कथित गैरप्रकारांचा संदर्भ देत बावनकुळे यांनी यावेळी चारा छावण्या किंवा चारा डेपो सुरू करण्यात आल्यास संपूर्ण प्रक्रियेवर कडक देखरेख ठेवण्यात येईल, असे सांगितले. कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये, यासाठी प्रशासनाला विशेष सूचना दिल्या जातील. दरम्यान, आगामी काळात परतीचा पाऊस झाला तर दुष्काळाची तीव्रता काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीला आळा घालण्यासाठी राज्य सरकारकडून 'महाखनिज २.०' ही व्यवस्था राबविण्यात येणार असल्याची माहितीही बावनकुळे यांनी दिली. या माध्यमातून खनिज उत्खनन आणि वाहतुकीवर डिजिटल पद्धतीने लक्ष ठेवले जाणार आहे. कोकण विभागीय आयुक्तांच्या अंतर्गत राज्यस्तरीय वॉर रूम, तसेच जिल्हास्तरावर स्वतंत्र वॉर रूमच्या माध्यमातून खनन व्यवहारांवर देखरेख ठेवण्यात येणार आहे. घर बांधण्यासाठी आवश्यक असलेल्या गौण खनिजाची मात्रा नागरिकांनी घोषित करून थेट रॉयल्टी भरण्याची व्यवस्था केली जाणार आहे. या डिजिटल व्यवस्थेमुळे अवैध खनिज वाहतुकीवर नियंत्रण मिळवण्यास मदत होईल, असा दावा बावनकुळे यांनी केला. या धोरणातून पुढील तीन वर्षांत राज्य सरकारला सुमारे २५ हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

शक्तिपीठ महामार्गाच्या प्रकल्पाला काही भागांत होत असलेल्या विरोधावरही बावनकुळे यांनी भाष्य केले. काही राजकीय व्यक्ती शेतकऱ्यांमध्ये प्रकल्पाबाबत गैरसमज निर्माण करत असल्याचा आरोप त्यांनी केला. जमीन अधिग्रहणाच्या मोबदल्यात शेतकऱ्यांना बाजारभावाच्या तुलनेत पाचपटपर्यंत भरपाई देण्याची तरतूद असल्याचा दावा त्यांनी केला. शक्तिपीठ महामार्गाची तुलना समृद्धी महामार्गाशी करत हा प्रकल्प महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना देणारी नवी जीवनरेखा ठरू शकतो, असेही बावनकुळे म्हणाले.

## चनकापूर हनुमान नगर परिसरात अर्धा किलो गांजा जप्त
## एक आरोपी दुचाकीसह ताब्यात !

**अक्षराज : दिवाकर घेर**




**दि.१८, नागपूर :** खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील चनकापूर हनुमान नगर परिसरात १७ सप्टेंबर गुरुवारला सायंकाळच्या सुमारास खापरखेडा पोलीस ठाण्यातील डीबी पथकाने एका आरोपीच्या दुचाकीच्या डिक्कीतून जवळपास अर्धा किलो गांजा जप्त केला असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

शैलेश रामलाल सुर्यवंशी (४४) वार्ड क्रमांक २ ओमनगर चनकापूर असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे

गुरुवारला सायंकाळी खापरखेडा पोलीस ठाण्यातील डीबी पथक चनकापूर हनुमान मंदिर परिसरात पेट्रोलिंग करीत होते. यादरम्यान आरोपी शैलेश सूर्यवंशी दुचाकी घेऊन संशयास्पद स्थितीत आढळून आला. पोलिसांचा संशय बळावल्यामूळे आरोपी शैलेश सूर्यवंशी याच्या दुचाकीची झडती घेतली असता दुचाकीच्या डिक्कीतून जवळपास अर्धा किलो गांजा आढळून आला.

डीबी पथकाने आरोपी शैलेश सूर्यवंशी ताब्यात घेऊन दुचाकी व अर्धा किलो गांजा जप्त केला. मागील अनेक दिवसांपासून चनकापूर व गणेश मंदिर टेकडी परिसरात गांजा व अमली पदार्थांची सर्रास विक्री सुरू असल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे. गांजा प्रकरणातील मुख्य सूत्रधार तस्कर वेगळेच असल्याची माहिती मिळाली असून पोलिसानी योग्य दिशेने तपास केल्यास मोठे घबाड हाती लागण्याची शक्यता आहे.

यासंदर्भात खापरखेडा पोलिसानी आरोपी शैलेश सूर्यवंशी विरुद्ध बीएनएस कायद्यानुसार विविध कलमांव्ये गुन्हा दाखल केला असून दुचाकी व अर्धा किलो गांजा जप्त केला आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सचिन यादव, पोलीस उपनिरीक्षक अजिंक्य कदम, पोहवा मुकेश महालगावे, मंगेश लांजेवार, निल गंगावने सचिन दखने, अरुण चांदने, pc हेमराज यांनी कार्यवाही पार पाडली.

# चंद्रपूर जिल्ह्यातील ६४० शेतकऱ्यांच्या हक्काचे १८.२६ कोटी रुपयांचे,
## अनुदान मिळवून देण्यासाठी आ.सुधीर मुनगंटीवार यांचा ठाम पाठपुरावा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** जिल्ह्यातील कृषी यांत्रिकीकरण (STATE SMAM) योजनेअंतर्गत ट्रॅक्टर व हार्वेस्टर खरेदी केलेल्या ६४० पात्र शेतकऱ्यांचे तब्बल १८ कोटी २६ लाख ३ हजार रुपयांचे अनुदान मागील ३०८ दिवसांपासून प्रलंबित असल्याची गंभीर बाब आ. सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रयजी भरणे यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. शेतकऱ्यांनी शासनाच्या योजनेवर विश्वास ठेवून कर्ज काढून तसेच स्वतःच्या आर्थिक परिस्थितीतून निधी उभारून यंत्रसामग्री खरेदी केली आहे. मात्र, हक्काचे अनुदान वेळेत न मिळाल्याने त्यांच्यावर आर्थिक ताण वाढला असून, शेतकऱ्यांच्या या अडचणीची संवेदनशील दखल घेत आ. मुनगंटीवार यांनी प्रलंबित अनुदान तातडीने खात्यावर जमा करण्याची आग्रही मागणी केली आहे.

कृषी यांत्रिकीकरणाचा लाभ घेताना शेतकऱ्यांनी मोठी आर्थिक गुंतवणूक केली आहे. शासनाच्या योजनेतून अनुदान मिळणार असल्याच्या विश्वासावर त्यांनी ट्रॅक्टर व हार्वेस्टरची खरेदी केली. मात्र, तब्बल दहा महिन्यांहून अधिक काळ अनुदान प्रलंबित राहिल्याने अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. काही ठिकाणी संतप्त शेतकऱ्यांनी आपले ट्रॅक्टर थेट कृषी अधिकारी कार्यालयाच्या आवारात आणून उभे करण्याची भूमिका घेतली आहे. ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी पत्रात स्पष्ट केले.



शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे केवळ प्रशासकीय बाब म्हणून न पाहता त्यांच्या प्रत्यक्ष अडचणी समजून घेऊन तातडीने तोडगा काढणे आवश्यक आहे, अशी भूमिका आ. सुधीर मुनगंटीवार यांनी घेतली आहे. शेतकऱ्याने शासनाच्या योजनेवर विश्वास ठेवून आपली जबाबदारी पूर्ण केल्यानंतर त्याच्या हक्काच्या अनुदानासाठी कार्यालयांच्या फेऱ्या मारण्याची वेळ येऊ नये, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रलंबित अनुदानामुळे संबंधित शेतकऱ्यांवर आर्थिक भार वाढत असून, कृषी यांत्रिकीकरण योजनेच्या मूळ उद्देशालाच बाधा निर्माण होत आहे. उत्पादन खर्च कमी करणे, शेतीची कामे वेळेत पूर्ण करणे आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे हा या योजनेचा उद्देश आहे. मात्र, अनुदानाच्या विलंबामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित आर्थिक दिलासा मिळत नसल्याचे आ. मुनगंटीवार यांनी कृषी मंत्री यांना पत्र लिहत निदर्शनास आणून दिले. त्यामुळे ६४० शेतकऱ्यांचे १८ कोटी २६ लाख ३ हजार रुपयांचे प्रलंबित अनुदान वितरित करण्यासाठी तातडीने आवश्यक निधी उपलब्ध करून देऊन तो थेट संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी त्यांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे केली आहे. तसेच अनुदान वितरणास विलंब होण्यामागील कारणांची तातडीने चौकशी करून संबंधित स्तरावर आवश्यक कार्यवाही करावी आणि भविष्यात (STATE SMAM) योजनांचे अनुदान दीर्घकाळ प्रलंबित राहणार नाही, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी मागणीही आ. मुनगंटीवार यांनी पत्राद्वारे केली आहे.

## त-हाडी शिवारात बिबट्याचा महिलेवर हल्ला;
## ज्योती मोरे सुदैवाने बालंबाल वाचल्या

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**



**दि.१८, शिरपूर (धुळे) :** शिरपूर तालुक्यातील ममाणे शिवारात पहाटेच्या ३ वाजेच्या सुमारास बिबट्याने एका महिलेवर अचानक प्राणघातक हल्ला केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. या हल्ल्यात ज्योती मोरे या महिला शेतकरी बालंबाल वाचल्या असून, त्यांच्या सतर्कतेमुळे आणि प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला आहे.

**पहाटे ३ वाजेची घटना :** मिळालेल्या माहितीनुसार, ज्योती मोरे या नेहमीप्रमाणे पहाटे ३ वाजेच्या सुमारास आपल्या शेतात पिकांची राखण करत होत्या. या दरम्यान अंधाराचा फायदा घेत दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर अचानक झेप घेतली. अचानक झालेल्या या हल्ल्याने घाबरून न जाता ज्योती मोरे यांनी आरडाओरड केली आणि प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. त्यांचा आवाज ऐकून आसपासच्या भागातील लोक आणि शेजारी धावून आल्याने बिबट्याने जंगलाच्या दिशेने ठोकली.

**नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण :** या घटनेत ज्योती मोरे यांना सुदैवाने मोठी दुखापत झाली नसून त्या सुखरूप आहेत. मात्र, या प्राणघातक हल्ल्यामुळे त-हाडी आणि लगतच्या परिसरात प्रचंड घबराट पसरली आहे. शिवारात बिबट्याचा मुक्त वावर असल्याने शेतात काम करण्यासाठी जाणाऱ्या बळीराजाच्या जीवाचा धोका वाढला आहे.

**वनविभागाने तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी :** पहाटेच्या वेळी घडलेल्या या घटनेनंतर स्थानिक ग्रामस्थांनी वनविभागाकडे तीव्र संताप व्यक्त केला आहे. बिबट्याला पकडण्यासाठी त-हाडी शिवारात तातडीने पिंजरा लावावा आणि रात्रीच्या वेळी गस्त वाढवावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. शेतकरी आणि मजुरांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# युवासेनेचा 'गनिमी कावा' निफाड नगरपंचायत मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात सोडले मोकाट कुत्रे

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१८, निफाड (नाशिक) :** निफाड शहर व उपनगरांमध्ये दिवसेंदिवस वाढणाऱ्या मोकाट कुत्र्यांच्या उपद्रवाविरोधात युवासेनेने आक्रमक पवित्रा घेत अनोखे आंदोलन केले. युवासेना जिल्हाप्रमुख विक्रम रंधवे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी थेट निफाड नगरपंचायतीचे मुख्याधिकारी धीरज भामरे यांच्या दालनात ४ ते ५ मोकाट कुत्रे आणून सोडले. यासोबतच मुख्याधिकाऱ्यांच्या टेबलाला चलनातील नोटांचा हार घालत प्रशासनाच्या ढिम्म कारभाराचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला. या धडक आंदोलनामुळे नगरपंचायत आवारात काही काळ प्रचंड खळबळ उडाली. शहरातील विविध प्रभागांमध्ये मोकाट कुत्र्यांची टोळकी रस्त्यांवर फिरत असल्याने लहान मुले, वृद्ध नागरिक आणि दुचाकीस्वार यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. कुत्र्यांच्या नसबंदीची मोहीम राबवणे आणि श्वान पकड पथक तैनात करणे गरजेचे असताना नगरपंचायत प्रशासन मात्र याकडे सपशेल दुर्लक्ष करत असल्याचा आरोप



आंदोलकांनी केला. वारंवार तक्रारी करूनही पालिका ढिम्म राहिल्याने अखेर प्रशासनाला जागे करण्यासाठी हे आंदोलन छेडण्यात आल्याचे रंधवे यांनी सांगितले. या समस्येवर तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना न झाल्यास नागरिकांना सोबत घेऊन पुन्हा कार्यालयात कुत्रे सोडण्याचा इशाराही या वेळी देण्यात आला.

या आंदोलनात नगरसेविका रूपाली रंधवे, सुनील पाठक, बिरजू पठाण, रतन गाजरे, सचिन खडताळे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

**७३ श्वानांचे निर्जंतुकीकरण पूर्ण : मुख्याधिकारी**

मोकाट कुत्र्यांच्या समस्येवर नगरपंचायतीकडून उपाययोजना सुरू असून आतापर्यंत ७३ कुत्र्यांचे निर्जंतुकीकरण करण्यात आले आहे. श्वान पकडणे व निर्जंतुकीकरणासाठी नगरपंचायतीने दोन वेळा निविदा काढल्या आहेत. प्रशासन ही समस्या सोडवण्यासाठी गंभीर असून नागरिकांनी सहकार्य करावे.

**– धीरज भामरे, मुख्याधिकारी, निफाड नगरपंचायत**

उपजिल्हा रुग्णालयात दरमहा १०० हून अधिक श्वानदंशाचे रुग्ण निफाड उपजिल्हा रुग्णालयात दररोज श्वानदंशाचे सरासरी ५ ते ६ रुग्ण उपचारासाठी दाखल होत आहेत. एका महिन्यात १०० हून अधिक रुग्णांवर उपचार करावे लागत असल्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. राजीव तांबाळे यांनी सांगितले. दरम्यान, रुग्णालयात अँटी-रेबीज लस पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## सोन्याबाई ठक्करवाड माध्यमिक विद्यालयात १४ मुलींना सायकली वाटप

**अक्षराज : दत्ता हमंद**



**दि.१८, कुंडलवाडी :** मुलींना मानव विकास योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील सायकली वाटप करण्यात आल्या आहेत.

ग्रामीण भागातील मुलींना दररोज शाळेला ये-जा करण्यासाठी महाराष्ट्र शासन शिक्षण विभागातील मानव विकास योजनेअंतर्गत दरवर्षी इयत्ता आठव्या वर्गात शिकणाऱ्या मुलींना मोफत सायकली मिळतात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये मान्य झालेल्या एकूण १४ मुलींना दि.१७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून मानव विकास अंतर्गत प्राप्त झालेल्या सायकलीची वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन बसवंत पाटील भाले तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच शिवलिंग पाटील धावंडे, अशोक पाटील भाले, विजय दिंडे, गजानन पाटील भाले, कपिल मॅकलवार, शंकर पाटील सोलगे, मारोती प्याटेकर, देवराव पाटील दिंडे, चंद्रकांत दिंडे, दिगांबर संगमकर आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.बी. जिंकले सर सहशिक्षक डी. एस.बोडके, सौ.एम.डी. सोमवंशी, बी.एस.गुरुडे,सौ.एस.डी.देगावे, यु.व्ही. भाले,एम. एन.आकुलवार, एन.जी.लोलापोड, एस.एस.म्याकलवार, आर.एम.म्याकलोड व विद्यार्थिनींचे पालक उपस्थित होते.




## ही तर बोलाचीच कढी!

पर्शियाच्या आखातात दररोज नवनव्या घडामोडी घडत असताना आणि इराणचे सौदी अरेबिया तसेच इतर देशांवरील हल्ले पुन्हा वाढत असताना अमेरिकेने पुन्हा एकदा आपला मोर्चा रशियाच्या दिशेने वळवल्याचे चित्र दिसत आहे. भारतात सध्या ब्रिक्स परिषदेची लगबग आहे आणि माध्यमांमध्येही त्याचीच मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहे. मात्र, या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे लक्ष रशिया-युक्रेन संघर्षाकडे पुन्हा वळले आहे, ही बाब लक्षवेधी ठरते.

पाच सप्टेंबरला अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे विशेष दूत म्हणून त्यांचे जावई जॅरेड कुश्नर आणि स्टीव्ह विटकॉफ यांनी रशियाची राजधानी मॉस्कोचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी जवळपास तीन तास चर्चा केली. त्यानंतर त्यांनी युक्रेनची राजधानी कीव्हलाही भेट दिली. जानेवारी २०२६ नंतर अमेरिकेकडून अशा प्रकारचे प्रयत्न पहिल्यांदाच होताना दिसत आहेत. या चर्चेचा संपूर्ण तपशील अद्याप समोर आलेला नसला तरी हा दौरा शांततेच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल असल्याचे संकेत मिळतात.

रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धाला आता जवळपास साडेचार वर्षे झाली आहेत. तरीही या युद्धाचा शेवट होण्याची कोणतीही ठोस चिन्हे अद्याप दिसत नाहीत. युद्ध सुरू झाल्यानंतर काही दिवसांतच रशिया निर्णायक विजय मिळवेल, असे अनेकांचे अनुमान होते. मात्र, 'नाटो' आणि विशेषतः अमेरिकेच्या मदतीने युक्रेनने दाखवलेल्या प्रतिकारामुळे रशियाला अपेक्षित विजय मिळवता आलेला नाही. दोन्ही बाजू गेली अनेक वर्षे या युद्धात होरपळत आहेत. प्रचंड जीवितहानी, आर्थिक नुकसान आणि पायाभूत सुविधांची नासधूस होऊनही युद्ध थांबण्याची शक्यता अजूनही अस्पष्टच आहे.

कुश्नर आणि विटकॉफ यांचा दौरा सुरू होण्यापूर्वी ट्रम्प यांनी अमेरिकन माध्यमांशी संवाद साधला. या संवादादरम्यान त्यांनी युद्ध संपवण्यासाठी एक प्रस्ताव तयार असल्याचे सांगितले. मात्र, या प्रस्तावात नेमके काय आहे, याचा तपशील त्यांनी दिला नाही. त्यामुळे या दौऱ्यानंतर काही तरी ठोस हाती लागेल, अशी जगभरात अपेक्षा निर्माण झाली होती. परंतु दौऱ्यानंतर कोणत्याही मुद्द्यावर स्पष्टता मिळाली नाही. शांततेसाठी कोणता आराखडा मांडला गेला, रशियाची प्रतिक्रिया काय होती किंवा युक्रेनने कोणत्या अटी मांडल्या, याबाबत अधिकृत पातळीवर फारशी माहिती समोर आली नाही.

या दौऱ्यातील एक बाब मात्र विशेष लक्षवेधी ठरली. या चर्चांमध्ये केवळ युद्धाचा अंत करण्याची चर्चा झाली नाही, तर अमेरिका आणि रशिया यांच्यात विविध पातळ्यांवर सहकार्य वाढवण्याविषयीही चर्चा झाल्याचे माध्यमांना सांगण्यात आले. याचा अर्थ असा की अमेरिकेला आता केवळ युद्ध थांबवण्यात रस नाही, तर रशियासोबत काही प्रमाणात सहकार्य वाढवण्यातही रस आहे. जागतिक व्यापार, ऊर्जा बाजार, शस्त्रनियंत्रण आणि राजनैतिक संतुलनाच्या दृष्टीने ही बाब महत्त्वाची ठरू शकते. २०२४ मध्ये अमेरिकेत झालेल्या अध्यक्षीय निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांनी जो बायडेन यांच्या रशिया धोरणावर जोरदार टीका केली होती. आपण निवडणूक जिंकून अध्यक्ष झालो तर पहिल्या शंभर दिवसांत रशिया-युक्रेन संघर्षावर तोडगा काढू, असे आश्वासन त्यांनी दिले होते. मात्र, ट्रम्प सत्तारूढ होऊन दीड वर्ष झाले असले तरी त्यांना या आघाडीवर काही ठोस साध्य करता आलेले नाही. उलट, ट्रम्प यांच्या कार्यकाळात अमेरिकेचे मित्रराष्ट्रांशीही संबंध अनेकदा तणावपूर्ण झाले. त्यामुळे ट्रम्प यांच्याविषयी अमेरिकेतही नाराजी वाढताना दिसते. दहा नोव्हेंबरला अमेरिकेत मध्यावधी निवडणुका आहेत. आतापर्यंत झालेल्या निवडणूक चाचण्यांमध्ये ट्रम्प प्रशासनाविरोधात आणि त्यांच्या रिपब्लिकन पक्षाविरोधात वातावरण असल्याची चिन्हे दिसत आहेत. त्यामुळे या निवडणुकांपूर्वी कोणत्या तरी पातळीवर ठोस यश दाखवण्याची गरज ट्रम्प यांना भासत आहे. युक्रेन युद्धाचा खर्च अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवरही मोठा भार टाकत आहे. युक्रेनला दिल्या जाणाऱ्या आर्थिक आणि लष्करी मदतीवरून रिपब्लिकन पक्षातही मतभेद वाढले आहेत. त्यामुळे ट्रम्प यांचे अपयश येत्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला महागात पडू शकते, अशी शक्यता नाकारता येत नाही.

**– संदेश सामंत**

# अवकाशातही शस्त्रे सज्ज : मानवजातीसाठी धोक्याची घंटा!

अवकाश हे केवळ पृथ्वीभोवती पसरलेले अमर्याद आकाश नाही, तर मानवाच्या वैज्ञानिक प्रगतीचे आणि भविष्यातील संधींचे विशाल व्यासपीठ आहे. उपग्रहांच्या माध्यमातून दळणवळण, हवामानाचा अंदाज, शेती, आपत्ती व्यवस्थापन, दिशादर्शन, संशोधन अशा असंख्य क्षेत्रांना मोठी मदत मिळते. त्यामुळे अवकाशाचा वापर शांततापूर्ण आणि मानवकल्याणासाठी होणे अपेक्षित आहे. मात्र अवकाशातही शस्त्रस्पर्धा वाढत असल्याची बातमी चिंताजनक आहे.

जगातील काही सामर्थ्यशाली राष्ट्रे पृथ्वीवरील सामरिक स्पर्धेबरोबरच अवकाशातही आपली संरक्षणक्षमता वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत. उपग्रहांचा नाश करू शकणारी किंवा त्यांना निष्क्रिय करणारी तंत्रज्ञानव्यवस्था विकसित झाल्यास त्याचा परिणाम केवळ दोन देशांपुरता मर्यादित राहणार नाही. आज जगातील बँकिंग, दळणवळण, हवामानविषयक माहिती,



जीपीएस, इंटरनेट आणि अनेक अत्यावश्यक सेवा उपग्रहांवर अवलंबून आहेत. त्यामुळे अवकाशातील संघर्षाचा परिणाम सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावरही होऊ शकतो.

अवकाशात शस्त्रे तैनात करण्यामागे सुरक्षेचे कारण दिले जात असले तरी त्यातून निर्माण होणारी शस्त्रस्पर्धा अधिक धोकादायक ठरू शकते. एका देशाने क्षमता वाढवली की दुसरा देश त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी आणखी प्रगत तंत्रज्ञान विकसित करतो. अशा स्पर्धेला मर्यादा न राहिल्यास अवकाश शांततेचे क्षेत्र न राहता संघर्षाचे नवे मैदान बनण्याची शक्यता आहे.

यातील आणखी गंभीर बाब म्हणजे अवकाशातील पर्यावरणाची हानी. उपग्रहांवर हल्ले झाले किंवा त्यांचे तुकडे झाले तर मोठ्या प्रमाणात अवकाशीय कचरा निर्माण होऊ शकतो. हा कचरा वेगाने पृथ्वीभोवती फिरत राहतो आणि इतर उपग्रह तसेच अंतराळयानांसाठी धोका निर्माण करू शकतो. एका घटनेत निर्माण झालेला कचरा पुढे अनेक धोकादायक धडकांना कारणीभूत ठरू शकतो. त्यामुळे अवकाशातील प्रदूषण वाढण्याचा धोका दुर्लक्षित करता येणार नाही.

मानवाने पृथ्वीवरील नैसर्गिक साधनसंपत्तीचा मोठ्या प्रमाणात वापर करून पर्यावरणाचे नुकसान केले आहे. आता हीच चूक अवकाशातही केली तर त्याचे परिणाम भविष्यातील पिढ्यांना भोगावे लागू शकतात. निसर्गाशी छेडछाड केल्याचे परिणाम पृथ्वीला भोगावे लागतात; त्याचप्रमाणे अवकाशाशी केलेली बेफिकीर छेडछाड मानवाच्या भविष्यासाठी संकट निर्माण करू शकते.

अवकाशावर कोणत्याही एका देशाचा अधिकार नसून तो संपूर्ण मानवजातीच्या वैज्ञानिक प्रगतीशी संबंधित आहे. त्यामुळे अवकाशाचा वापर युद्धासाठी नव्हे, तर संशोधन, हवामान निरीक्षण, आपत्ती व्यवस्थापन, दळणवळण आणि मानवकल्याणासाठी व्हायला हवा. राष्ट्रांनी परस्पर विश्वास, पारदर्शकता आणि आंतरराष्ट्रीय नियमांच्या माध्यमातून अवकाशातील शस्त्रस्पर्धेला आळा घालण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे.

पृथ्वीवरील युद्धे थांबविण्याचे आव्हान अजूनही कायम असताना अवकाशात युद्धाची तयारी करणे ही मानवाच्या विवेकाची परीक्षा आहे. अवकाश जिंकण्याची नव्हे, तर जपण्याची गरज आहे. कारण अवकाशाचे रक्षण म्हणजे केवळ उपग्रहांचे रक्षण नव्हे; ते पृथ्वीच्या पर्यावरणाचे, विज्ञानाच्या प्रगतीचे आणि मानवजातीच्या भविष्यातील सुरक्षिततेचे रक्षण आहे.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# १८,६०० किलो निर्माल्य संकलन : या आकडेवारीमागची कहाणी आम्हाला समजेल का?

ठाणे महानगरपालिकेने गणेशोत्सवाच्या काळात निर्माल्य संकलित करून त्याचे शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करण्याबाबत प्रसिद्ध केलेली माहिती वाचली. सर्वप्रथम, या उपक्रमासाठी ठाणे महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापन विभाग आणि या कामात सहभागी असलेल्या सर्व अधिकारी, कर्मचारी आणि कामगारांचे मनापासून अभिनंदन करावेसे वाटते. गणेशोत्सवाच्या काळात हजारो गणेशमूर्तींचे विसर्जन होते आणि त्यासोबत मोठ्या प्रमाणावर फुले, हार, पाने आणि इतर सेंद्रिय निर्माल्य निर्माण होते. हे निर्माल्य जलस्रोतांमध्ये जाण्यापासून रोखणे, त्याचे स्वतंत्र संकलन करणे, त्यातील प्लास्टिक वेगळे करणे आणि सेंद्रिय सामग्रीवर प्रक्रिया करणे, हे निश्चितच मोठ्या प्रमाणावर नियोजन आणि मनुष्यबळाची गरज असलेले काम आहे.

त्यामुळे १५ सप्टेंबर २०२६ रोजी दीड दिवसाच्या कालावधीत २० हजार ७०३ गणेशमूर्तींचे विसर्जन आणि सुमारे १८ हजार ६०० किलो निर्माल्याचे संकलन झाले, ही माहिती निश्चितच लक्षवेधी आहे. विशेषतः एवढ्या मोठ्या प्रमाणावर निर्माल्य इतक्या कमी कालावधीत संकलित करून त्याचे वर्गीकरण सुरू करणे ही निश्चितच प्रशंसनीय प्रशासकीय कामगिरी आहे. या कामात सहभागी असलेल्या सर्वांचे पुन्हा एकदा अभिनंदन.

### आगमन्

जेष्ठा कनिष्ठा गौरीचे
होता सुखे आगमन्
अलक्ष्मी निघून जाई
कु प्रवृत्ती बहिर्गमन्

विघ्नहर्त्या अंतरातून
उत्साहे करता नमन
दुःख अन् दारिद्र्याचे
सुखकर घडते दमन

श्री चरणांचे रज गुण
तमोगुण हो उपशमन
आरंभींशरीरशुद्धयर्थ
वेदोक्त करी आचमन

तीर्थ बनते नीर साधे
देवतांचे पाद प्रक्षालन
उमलून येई भरभराट
स श्रद्ध वाहता सुमन

निर्माल्य होती पातके
करावे जळी विसर्जन
श्वास निर्मळ विश्वासे
निश्वासेव्यथाउत्सर्जन

नैवेद्यदावे मनोवाच्छी
सु प्रसाद करी सेवन
तृप्तोदर करी लंबोदर
जठराग्नीचे हो शमन

गणेश याग मंत्रोच्चारा
सत्शीलतेने होम हवन
जळे कु शक्ती किटाणू
वातावरण होई पावन

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

मात्र, हीच माहिती वाचताना माझ्या मनात काही प्रश्न निर्माण झाले. हे प्रश्न महापालिकेच्या कामावर शंका घेण्यासाठी किंवा दोष शोधण्यासाठी नाहीत. उलट, महापालिकेने केलेले चांगले काम नागरिकांना अधिक स्पष्टपणे समजावे, त्याचे कौतुक करता यावे आणि प्रशासनावरील विश्वास आणखी दृढ व्हावा, या भावनेतून हे प्रश्न विचारावेसे वाटतात.

प्रसिद्धीपत्रकात १८ हजार ६०० किलो निर्माल्य संकलित झाल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, हे निर्माल्य नेमके कोणकोणत्या ठिकाणांहून संकलित झाले, हा तपशील स्पष्ट होत नाही. ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व विसर्जन स्थळांवरून हा आकडा जमा झाला आहे का, की काही निवडक विसर्जन स्थळांवरील संकलनाचा हा आकडा आहे? किती निर्माल्य संकलन केंद्रे कार्यरत होती? प्रत्येक केंद्रावर किती निर्माल्य जमा झाले? संकलनाची ठिकाणे आणि स्थाननिहाय आकडेवारी उपलब्ध झाली, तर नागरिकांना या उपक्रमाची वास्तविक व्याप्ती अधिक चांगल्या प्रकारे समजेल.

कारण ठाणे महानगरपालिका क्षेत्रात १८ हजार ६०० किलो निर्माल्य संकलित झाले आणि विशिष्ट संकलन केंद्रांवर १८ हजार ६०० किलो निर्माल्य संकलित झाले, या दोन विधानांचा अर्थ वेगळा आहे. म्हणूनच या आकड्याचा भौगोलिक आवाका स्पष्ट होणे महत्त्वाचे आहे.

२० हजार ७०३ गणेशमूर्ती आणि १८ हजार ६०० किलो निर्माल्य या दोन आकड्यांचा साधा हिशोब केला तर प्रति मूर्ती साधारण ०.९ किलो निर्माल्य असे सरासरी प्रमाण दिसते. हा आकडा स्वतःमध्ये महत्त्वाचा आहे. मात्र, १८ हजार ६०० किलो हा आकडा प्रत्यक्ष कसा मोजला गेला, हे जाणून घेणेही तितकेच आवश्यक आहे. संकलन करणाऱ्या वाहनांचे वजन करण्यात आले का? वजनकाट्याच्या नोंदी ठेवण्यात आल्या का? हा सर्ॉी ुशळसहीं आहे की निर्माल्याचे पशीं ुशळसहीं? त्यामध्ये पाणी, प्लास्टिक पिशव्या किंवा इतर मिश्रित कचऱ्याचा समावेश आहे का? या प्रश्नांची उत्तरे मिळाली तर प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीवरील नागरिकांचा विश्वास आणखी वाढेल.

प्रसिद्धीपत्रकात संकलित निर्माल्यामध्ये साधारण ३ टक्के प्लास्टिक पिशव्यांचे प्रमाण आढळल्याचे सांगण्यात आले आहे. १८ हजार ६०० किलोच्या तीन टक्के प्रमाणाचा हिशोब केला तर ते सुमारे ५५८ किलो प्लास्टिक होते. मात्र, जर प्रत्यक्ष नोंदवलेले प्लास्टिकचे वजन ६२१ किलो असेल, तर ते एकूण निर्माल्याच्या सुमारे ३.३४ टक्के ठरते. ६२१ किलो म्हणजे तब्बल ६ लाख २१ हजार ग्रॅम प्लास्टिक

आता केवळ समजण्यासाठी एका प्लास्टिक पिशवीचे सरासरी वजन १० ग्रॅम धरले, तर ६ लाख २१ हजार ग्रॅम म्हणजे सुमारे ६२ हजार १०० प्लास्टिक पिशव्या. म्हणजेच साधारण ६० हजारांहून अधिक पिशव्या. २० हजार ७०३ मूर्तींच्या तुलनेत पाहिले, तर या गृहीतकानुसार प्रत्येक मूर्तीसोबत सरासरी सुमारे तीन प्लास्टिक पिशव्या आल्याचे चित्र दिसते. हा केवळ अंदाजाधारित हिशोब आहे; प्रत्यक्ष पिशव्यांची संख्या सांगण्यासाठी त्यांचे वजन आणि सरासरी पिशवीचे प्रत्यक्ष वजन निश्चित असणे आवश्यक आहे.

म्हणूनच माझ्या मनात स्वाभाविक प्रश्न निर्माण होतोएवढ्या मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्या निर्माल्यासोबत नागरिकांनी आणल्या होत्या का? की संकलन, वाहतूक किंवा इतर प्रक्रियेत काही प्लास्टिक त्यात मिसळले गेले? आणि तीन टक्के हा आकडा नेमका वजनाच्या आधारावर आहे की अन्य कोणत्या पद्धतीने निश्चित करण्यात आला? याचे उत्तर मिळाले तर




या आकडेवारीचा अर्थ अधिक स्पष्ट होईल. आणि जर खरोखरच एवढ्या मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्या निर्माल्यासोबत येत असतील, तर तो पुढील वर्षाच्या जनजागृतीसाठी अत्यंत महत्त्वाचा संदेश ठरू शकतो.

या सर्व प्रश्नांसोबत एक गोष्ट मी विशेषत्वाने नमूद करू इच्छितो. दीड-दोन दिवसांच्या कालावधीत २० हजार ७०३ गणेशमूर्तींच्या विसर्जनातून निर्माण झालेल्या सुमारे १८.६ टन निर्माल्याचे संकलन करणे आणि त्यातील प्लास्टिक वेगळे करण्याची प्रक्रिया राबवणे हे निश्चितच मोठे काम आहे. त्यासाठी संकलन व्यवस्था, वाहतूक, मनुष्यबळ, तात्पुरती साठवण, वर्गीकरण आणि पुढील प्रक्रिया यांचा समन्वय आवश्यक असतो. त्यामुळे एवढ्या कमी कालावधीत ही यंत्रणा कार्यरत ठेवणे आणि एवढ्या मोठ्या प्रमाणावर सामग्री हाताळणे निश्चितच कौतुकास्पद आहे.

म्हणूनच माझे प्रश्न या कामाचे महत्त्व कमी करण्यासाठी नाहीत. उलट, एवढे मोठे काम झाले आहे म्हणूनच त्याची अधिक सविस्तर माहिती नागरिकांसमोर आली पाहिजे, असे मला वाटते.

प्रसिद्धीपत्रकात प्लास्टिक निर्माल्यापासून वेगळे करून त्याचे व्यवस्थापन चठऋ उशपींअ‍ॅश मध्ये करण्यात येत असल्याचे सांगितले आहे. ही बाब स्वागतार्ह आहे. मात्र, कोणत्या चठऋ उशपींअ‍ॅश मध्ये हे प्लास्टिक पाठविण्यात आले, ते केंद्र कुठे आहे, किती किलो प्लास्टिक तेथे पाठविण्यात आले आणि पुढे त्या प्लास्टिकचे काय झाले, याची माहितीही मिळाली तर संपूर्ण व्यवस्थापन साखळी नागरिकांना समजू शकेल. संकलन, वर्गीकरण, चठऋ आणि पुढील पुनर्वापर किंवा व्यवस्थापन या प्रत्येक टप्प्याची नोंद सार्वजनिक झाली तर या उपक्रमाची विश्वासार्हता अधिक वाढेल.

त्याचप्रमाणे हिरानंदानी इस्टेट, ऋतू पार्क आणि कौसा येथील मेकॅनिकल बायो-कंपोस्टिंग प्रकल्पांमध्ये निर्माल्यावर प्रक्रिया केली जात असल्याचे सांगण्यात आले आहे. ही माहिती सकारात्मक आहे. मात्र, १८ हजार ६०० किलोपैकी किती निर्माल्य कोणत्या प्रकल्पाकडे पाठविण्यात आले, हे समजले तर चित्र अधिक स्पष्ट होईल. त्याहून महत्त्वाचे म्हणजे, या प्रक्रियेतून प्रत्यक्ष किती किलो कंपोस्ट तयार झाले, किती अवशेष राहिला आणि त्या अवशेषाचे काय करण्यात आले, हे समजणे आवश्यक आहे.

उदाहरणार्थ, केवळ प्रक्रिया समजून घेण्यासाठी १८ हजार ६०० किलो निर्माल्यातून ३० टक्के उपयुक्त उत्पादन मिळाले असे गृहीत धरले, तर सुमारे ५ हजार ५८० किलो कंपोस्ट तयार होऊ शकतो. पण हा ढचउ चा प्रत्यक्ष आकडा नाही; हा केवळ उदाहरणार्थ केलेला हिशोब आहे. म्हणूनच प्रत्यक्ष प्रक्रियेनंतर तयार झालेल्या कंपोस्टचे वजन जाहीर झाले तर नागरिकांना संकलनापासून संसाधन पुनर्प्राप्तीपर्यंतची संपूर्ण कहाणी समजेल.

इथेच मला एक महत्त्वाचा फरक जाणवतो१८ हजार ६०० किलो निर्माल्य संकलित केले हा एक महत्त्वाचा कृतीचा आकडा आहे; पण तो स्वतःहून अंतिम पर्यावरणीय परिणाम सांगत नाही. पर्यावरणीय योगदान समजण्यासाठी किती निर्माल्य जलस्रोतांपासून वळवले गेले, एकूण निर्माण झालेल्या निर्माल्यापैकी किती टक्के संकलित झाले, किती सेंद्रिय सामग्री कंपोस्टिंगला गेली, किती कंपोस्ट तयार झाले, किती प्लास्टिक वेगळे झाले आणि किती अवशेष राहिला, याची माहिती आवश्यक आहे.

याचबरोबर माझ्या मनात आणखी एक प्रश्न आहेही आकडेवारी केवळ १५ सप्टेंबरच्या दीड दिवसाच्या विसर्जनाची आहे की संपूर्ण गणेशोत्सवातील संकलनाची? कारण गणेशोत्सव अनेक दिवस चालतो. जर १८ हजार ६०० किलो हा केवळ दीड दिवसाचा आकडा असेल, तर तो त्या कालावधीतील निश्चितच महत्त्वाचा डेटा आहे. मात्र, संपूर्ण गणेशोत्सवाचा पर्यावरणीय परिणाम समजून घेण्यासाठी उर्वरित दिवसांची आकडेवारीही आवश्यक आहे.

मागील वर्षाशी तुलना झाली तर ही माहिती आणखी अर्थपूर्ण ठरेल. २०२५ मध्ये किती गणेशमूर्तींचे विसर्जन झाले, किती निर्माल्य संकलित झाले, प्रति मूर्ती निर्माल्याचे प्रमाण किती होते, किती प्लास्टिक वेगळे झाले आणि किती कंपोस्ट तयार झाले, याची तुलना २०२६ शी केली तर आपण किती काम केले यापेक्षा आपण किती प्रगती केली हे नागरिकांना समजू शकेल.

नागरिक म्हणून प्रशासनाला ही माहिती विचारणे म्हणजे प्रशासनाच्या कामावर अविश्वास व्यक्त करणे नव्हे. उलट, पारदर्शक माहिती ही विश्वासाची पायरी आहे. महापालिकेने यंत्रणा उभी केली, नागरिकांनी निर्माल्य वेगळे दिले, कर्मचाऱ्यांनी ते संकलित केले, त्याचे वर्गीकरण केले, प्लास्टिक वेगळे केले आणि सेंद्रिय निर्माल्य कंपोस्टिंगकडे वळवलेही सकारात्मक प्रक्रिया आहे. तिचे प्रमाण आणि अंतिम परिणाम नागरिकांसमोर आले, तर या कामाचे महत्त्व आणखी वाढेल.

म्हणून माझी ही विनंती आक्षेप म्हणून नव्हे, तर कौतुक अधिक अर्थपूर्ण करण्यासाठी आहे.

१८ हजार ६०० किलो हा आकडा आम्हाला सांगा; पण त्यामागची संपूर्ण कहाणीही आम्हाला सांगा.

कुठून आले? किती ठिकाणांहून आले? कसे मोजले? किती प्लास्टिक वेगळे झाले? ते कोणत्या चठऋ उशपींअ‍ॅश मध्ये गेले? किती निर्माल्य कोणत्या कंपोस्टिंग केंद्रात गेले? किती कंपोस्ट तयार झाले? किती अवशेष राहिला? आणि सर्वांत महत्त्वाचेपर्यावरणाला प्रत्यक्ष काय फायदा झाला?

ही माहिती उपलब्ध झाली तर नागरिक महापालिकेला प्रश्न विचारण्यासाठी नव्हे, तर अधिक चांगले काम केल्याबद्दल मनापासून धन्यवाद देण्यासाठी पुढे येतील.

गणेशोत्सवातील पर्यावरणपूरकता ही केवळ घोषणा नसावी; ती आकडेवारीत दिसावी, प्रक्रियेत दिसावी आणि परिणामातही दिसावी. कारण जे मोजता येते, त्याची प्रगती करता येते; आणि ज्याची प्रगती दाखवता येते, त्यात नागरिकांचा विश्वास आणि सहभाग वाढवता येतो.

माझ्या मते, प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दुवा केवळ आदेशांनी तयार होत नाही. तो तयार होतो पारदर्शक माहितीने, पडताळता येणाऱ्या आकडेवारीने आणि प्रत्यक्ष परिणाम नागरिकांसमोर मांडल्याने.

ठाणे महानगरपालिकेने एवढ्या कमी कालावधीत एवढ्या मोठ्या प्रमाणावर निर्माल्य संकलित करून त्याचे वर्गीकरण करण्याचे काम केले आहेत्याबद्दल पुन्हा एकदा अभिनंदन.

आता या कामामागची थोडी अधिक माहिती आम्हाला मिळाली, तर आम्ही नागरिक केवळ बातमी वाचणार नाही; हे काम समजून घेऊ, त्याचे कौतुक करू आणि पुढील पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी प्रशासनासोबत अधिक भक्कमपणे उभे राहू.

हीच खरी भागीदारीप्रशासनाची कृती आणि नागरिकांचा विश्वास.

**– विजयकुमार कट्टी**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
**हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.**
**या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत.** Email : newsaksharaj2021@gmail.com **संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२**

# अक्षराज

## गौरी गणपती विशेष



श्री.संजीवन व सौ.मीना चव्हाण यांच्या येथील गौरी गणेशाचा सुंदर देखावा...



श्रावणपाटील परिवार, उटंबर (दापोली) यांचा मानाचा गणपती



श्री.सौ.कपिला किशोर रेपाळे
पुणेवाडी, ता.पारनेर, जि.अहिल्यानगर



कु अभिजीत (चंद्रभागा) हिरा म्हात्रे



हिताक्षी विजय बळीराम म्हात्रे व म्हात्रे परिवार याच्या घरातील गौराई माता वर्ष ५२
नवी मुंबई कोपरखेरणे गाव शिवसेना शाखा समोर बळीराम निवास



घणसोली गावातील जिया रविंद्र पाटील व स्वीटी पाटील आणि पाटील परिवाराचा
श्री गणराया घणसोली गाव, चिंचाआळी, घणसोली, नवी मुंबई, ठाणे



गंगाराम दत्तू दातिलकर, यंदा वर्ष ६२, नवसाची गौराई
(शिळगांव, पोस्ट पडले, ता. जि. ठाणे) यांच्या घरच्या गौराई



रविंद्र गणेश पाटील, नवसाची गौराई, यंदा वर्ष ५५,
(मु.डायघरगांव, पो.पडले, ता.जि.ठाणे) यांच्या घरच्या गौराई



काशिनाथ पाटील शेठ परिवार यंदाचा वर्ष ७८
(डायघरगांव, पोस्ट पडले, ता.जि ठाणे) यांचा घरचा गणपती बाप्पा



रत्ना पाटील (उत्तरशिवगांव, तालुका जिल्हा ठाणे)
यांच्या घरचा बाप्पा



मयुरी रवींद्र मोरे, बारामती यांच्या घरच्या गौराई



माधुरी गणेश केसकर
बोरी ता.खंडाळा जिल्हा सातारा, यांच्या घरच्या गौराई



संतोष व सौ.सीमा लोखंडे यांच्या घरातील गौरी गणेशाचा सुंदर देखावा



कु.अवनीश निलेश राणे यांच्या घरातील गणपती.



दिनेश म्हात्रे (शिळगांव, पोस्ट पडले, ता.जि.ठाणे)
यांचा घरचा गणपती बाप्पा

# नरखेड तालुका दुष्काळग्रस्त घोषित करा;आम आदमी पार्टीचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१८, नागपूर :** काटोल-नरखेड तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा या प्रमुख मागणीसह इतर शेतकरी हिताच्या मागणीसाठी काटोल येथे आम आदमी पार्टीच्या वतीने राज्य सचिव सुनील वडस्कर यांच्या उपस्थितीमध्ये व जिल्हाध्यक्ष वृषभ वानखेडे यांच्या नेतृत्वात उपविभागीय अधिकारी काटोल यांच्या मार्फत मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदन देण्यात आले.

सन २०२६ च्या पावसाळ्यात दिनांक ३० ऑगस्ट २०२६ पर्यंत विधानसभा क्षेत्रात केवळ १२५ मि.मी. पाऊस झालेला आहे. सदर क्षेत्रातील वार्षिक सरासरी पर्जन्यमान सुमारे ८७६ ते ११००मि. मी. इतके आहे. त्या तुलनेत यावर्षी झालेला पाऊस अत्यंत अपुरा असून पावसाच्या मोठ्या तुटवडा मुळे शेतकऱ्यासमोर गंभीर संकट निर्माण झाले आहे. पावसाअभावी सोयाबीन, कापूस, तुर, भुईमूग, भाजीपाला, तसेच संत्रा म ोसंबीच्या प्रमुख पिकावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला आहे. अपेक्षित पाऊस न झाल्यामुळे संपूर्ण खरीप हंगाम संकटात सापडलेला आहे. सोयाबीन पिकाची वाढ खुंटली असून शेंगा भरण्यावर परिणाम झाला आहे. कापूस पिकाची पाते गळण्यास सुरुवात झाली आहे. संत्रा मोसंबीच्या फळाची मोठ्या प्रमाणात गळ झाल्यामुळे फळबाग उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. पावसाअभावी तलाव व धरणांमध्ये पुरेसा जलसाठा झालेला नाही. पातळीतही अपेक्षित वाढ झालेली नाही. त्यामुळे काटोल-नरखेड तालुक्यातील शेतकरी अडचणीत सापडलेला आहे. त्याचप्रमाणे अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांना वन्यप्राणी व वन्यजीवांच्या वाढत्या उपद्रवामुळे उभ्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागत आहे. त्यामुळे काटोल-नरखेड तालुका दुष्काळग्रस्त घोषित करावा व वन्यजीवांपासून शेतकऱ्यांचे रक्षण करावे अशी मागणी आम आदमी पार्टीच्या वतीने याप्रसंगी करण्यात आली.

यावेळी काटोल-नरखेड तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा. पावसाअभावी नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना किमान १ लाख रु. प्रति हेक्टर नुकसान भरपाई देण्यात यावी, वन्यजीव व वन्य प्राण्यांमुळे नुकसान



झालेल्या शेतीचे पंचनामे करून नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक भरपाई देण्यात यावी, संत्रा मोसंबी व इतर फळबागांचे नुकसान झाल्यामुळे फळबाग शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, शेतकऱ्यांना कर्जमाफीची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी व कर्जाचे पुनर्गठन करण्यात यावे. शेतकऱ्यांच्या कृषी पंपाच्या विज बिलात माफी देण्यात यावी व वीज पुरवठा खंडित करण्याची कारवाई स्थगित करावी, शासनाकडून मंजूर होणारी मदत थेट व पारदर्शक पद्धतीने शेतकऱ्यांच्या खात्यात जमा व्हावे या मागणीसह १७ मागण्या यावेळेस शासनाकडे करण्यात आल्या.

याप्रसंगी भूषण ढाकुलकर, डॉ. कैलाश कडू, अहमद कादर, प्रकाश पाटील बोंद्रे, बाबाराव भोयर, अमोल गौरखेडे, अमोल भक्ते, निलेश पेठे, महादेवराव नखाते, धनराज तुमराम, कृष्णाजी डफरे, राजेंद्र ठाकरे, जयश्रीताई बंड, रोशनीताई बाजनघाटे, उत्तमराव वानखेडे, अंगदजी भैसवार, डॉ. गजभिये, गजानन बोंद्रे, केतन वानखेडे, कृष्णाजी ठाकरे, दिलीपजी वैद्य, गिरीश शेंडे, रामरावजी भाकरे, प्रशांत तागडे, ज्ञानेश्वर तिडके, प्रशांत घाडगे, गजानन धोटे, भोजराज मोहरीया, प्रकाशजी देशभ्रतार, सुनील गायकवाड, मंगेश चौधरी, विकास गिरे, निशांत गजभिये, विनोद क्षीरसागर, यांच्यासह काटोल नरखेड तालुक्यातून शेकडो शेतकरी उपस्थित होते.

# विहामांडवा मध्ये 'लोकसहयोग अर्बन' च्या ३ऱ्या शाखेचा दिमाखदार शुभारंभ



## आमदार विलासबाप्पू भुमरे यांच्या हस्ते सोहळा संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, विहामांडवा (छ. संभाजीनगर) :** स्थानिक नागरिक, शेतकरी आणि व्यापाऱ्यांना अद्ययावत व विश्वासार्ह बँकिंग सेवा पुरवण्याच्या उद्देशाने 'लोकसहयोग अर्बन' पतसंस्थेच्या विहामांडवा (शाखा क्र. ०३) शाखेचा भव्य शुभारंभ शुक्रवार, दि.१८ सप्टेंबर रोजी अत्यंत उत्साहात पार पडला.

सेंट्रल बँक शेजारील डुकरे कॉम्प्लेक्स येथे आयोजित या कार्यक्रम ाचे उद्घाटन आमदार विलासबाप्पू पा. भुमरे साहेब (चेअरमन, जिल्हा मध्यवर्ती बँक, छत्रपती संभाजीनगर) यांच्या शुभहस्ते फीत कापून व दीपप्रज्वलनाने झाले. याप्रसंगी बोलताना आमदार भुमरे म्हणाले की, ग्रामीण आणि निमशहरी भागाच्या आर्थिक विकासात पतसंस्थेचा वाटा मोठा आहे. विहामांडवा आणि परिसरातील व्यापारी, शेतकरी व बचत गटांना अल्प व्याजात कर्ज पुरवठा करून ही संस्था परिसराच्या प्रगतीला हातभार लावेल.

या सोहळ्यास विहामांडवा पंचक्रोशीतील सर्व सन्माननीय जि.प. व पं.स. सदस्य, ग्रामपंचायत प्रतिनिधी, वि.वि.का.से.सो. चे पदाधिकारी, व्यापारी, पत्रकार आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे चेअरमन मनोहर पा.कणसे, व्हा.चेअरमन प्रमोद पा.लांडगे, मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब पा.घोरपडे व प्रशासकीय अधिकारी संचालक सचिन पा.नाटकर यांच्यासह सर्व संचालक मंडळाने विशेष परिश्रम घेतले. उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# जिंतूर तालुक्यात दुचाकी अपघातांचा वाढता धोका

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१८, जिंतूर (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील विविध प्रमुख मार्गांवर गेल्या काही वर्षांत अपघातांच्या घटना सातत्याने समोर येत असून, विशेषतः दुचाकीस्वारांच्या अपघातांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. जिंतूर-परभणी, जिंतूर-मंठा, जिंतूर-औंढा नागनाथ आणि जिंतूर-येलदरी या मार्गांवर अपघातांच्या अनेक घटना घडल्या आहेत. या अपघातांमध्ये तरुणांचा मृत्यू, गंभीर दुखापत, हात-पाय मोडणे तसेच कायमस्वरूपी अपंगत्व येण्याच्या घटना सम ोर आल्या आहेत.उपलब्ध परभणी जिल्ह्याच्या अधिकृत रस्ता अपघात आकडेवारीनुसार, २०२१ मध्ये जिल्ह्यात ३३१ रस्ते अपघात नोंदले गेले असून १६८ अपघात प्राणघातक होते आणि १७७ जणांचा मृत्यू झाला. या मृतांपैकी ७१ टक्के मृत्यू दोन व तीन चाकी वाहनांशी संबंधित होते. त्याच अहवालात १८ ते २५ वयोगटातील तरुणांचाही मृत्यूचा मोठा वाटा दिसून येतो. २०२२ मध्ये परभणी जिल्ह्यात १८९ जणांचा रस्ता अपघातात मृत्यू झाला. त्यापैकी तब्बल १३९ म्हणजेच ७३ टक्के मृत्यू हे दोन व तीनचाकी वाहनांवरील व्यक्तींचे होते. १५ ते २१ या वेळेत प्राणघातक अपघातांचे प्रमाणही अधिक असल्याचे जिल्हास्तरीय आकडेवारीत दिसते.

### जिंतूर तालुक्यातील काही गंभीर घटना

२०२१ मध्ये जिंतूर-औंढा मार्गावर टेम्पो आणि दुचाकीच्या अपघातात २५ वर्षीय दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला होता.फेब्रुवारी २०२२ मध्ये जिंतूर-येलदरी मार्गावर दुचाकी आणि टेम्पोच्या धडकेत २६ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाला. त्या वेळी वृत्तानुसार, दोन महिन्यांच्या कालावधीत जिंतूर परिसरात अपघातांमध्ये ८ जणांचा मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आले होते. ऑक्टोबर २०२२ मध्ये येलदरी रोडवरील केहाळ फाट्यावर अज्ञात वाहनाच्या धडकेत १३ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला, तर दोघे जखमी झाले होते.फेब्रुवारी २०२४ मध्ये जिंतूर तालुक्यातील दोन वेगवेगळ्या अपघातांत दोन जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. एप्रिल २०२५ मध्ये शेवडी-भोसी मार्गावर खड्डा चुकवताना दुचाकीचा ताबा सुटून ती खोल नाल्यात कोसळली आणि दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला.

जानेवारी २०२५ मध्ये औंढा नागनाथ-जिंतूर



## प्रशासनासोबत पालकांनीही जबाबदारी स्वीकारण्याची गरज

मार्गावर कार आणि दुचाकीच्या धडकेत ४७ वर्षीय दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला, तर दोघे जखमी झाले. फेब्रुवारी २०२५ मध्ये जिंतूर-औंढा मार्गावर भरधाव दुचाकीची धडक बसल्याने २५ वर्षीय दीपक दराडे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेत रस्त्याच्या सुरू असलेल्या कामामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचाही उल्लेख वृत्तात करण्यात आला होता. ऑक्टोबर २०२५ मध्ये औंढा नागनाथ-जिंतूर मार्गावर दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन दोन जणांचा मृत्यू तर दोघे गंभीर जखमी झाले. जानेवारी २०२६ मध्ये जिंतूर-औंढा मार्गावरील भोगाव पाटीजवळ दोन वाहनांच्या धडकेत एका तरुणाचा मृत्यू तर दोघे गंभीर जखमी झाले. जून २०२६ मध्ये परभणी-जिंतूर महामार्गावरील कोक-पिंपरी फाट्याजवळ एसटी बस आणि दुचाकीच्या भीषण धडकेत एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये १२ वर्षांच्या मुलाचाही समावेश होता.

### पालकांनीही जबाबदारी स्वीकारण्याची वेळ

अपघातांसाठी केवळ प्रशासन किंवा रस्त्यांची परिस्थितीच जबाबदार आहे, असे म्हणणे पुरेसे ठरणार नाही. पालक, वाहनचालक आणि समाजातील प्रत्येक जबाबदार नागरिकानेही आपली भूमिका ओळखणे आवश्यक आहे.अल्पवयीन मुलांच्या हातात दुचाकी देणे, परवान्याशिवाय वाहन चालवू देणे, वेगाने वाहन चालवणे, ट्रिपल सीट प्रवास करणे, हेल्मेटकडे दुर्लक्ष करणे किंवा रात्री उशिरापर्यंत दुचाकीवरून प्रवास करण्यास मोकळीक देणे यामुळे धोका वाढू शकतो. केंद्राच्या रस्ता सुरक्षा मार्गदर्शिकेतही दुचाकीवर दोनपेक्षा जास्त व्यक्तींनी प्रवास करू नये आणि हेल्मेटचा वापर करावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### मुलाच्या हातात गाडी देण्यापेक्षा त्याचा जीव महत्त्वाचा

पालकांनी आपल्या मुलाला दुचाकी देण्यापूर्वी त्याचे वय, वैध ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन चालविण्याचा अनुभव आणि वाहतूक नियमांचे ज्ञान यांचा विचार करणे गरजेचे आहे. विशेषतः १८ वर्षांखालील मुलांना मोटारसायकल चालविण्यास देणे टाळणे अत्यावश्यक आहे.मुलगा गाडी मागतो म्हणून गाडी देणे ही पालकांची जबाबदारी नाही; मुलाचा जीव सुरक्षित ठेवणे ही खरी जबाबदारी आहे, असा संदेश या वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर पालकांनी घेण्याची गरज आहे.

### प्रशासनाने ही ठोस उपाययोजना कराव्यात

दुसरीकडे, रस्त्यांची दुरवस्था, खड्डे, अपूर्ण कामे, अपघातप्रवण ठिकाणे, योग्य दिशादर्शक फलकांचा अभाव, रात्रीची अपुरी प्रकाशव्यवस्था याकडे प्रशासनाने ही गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. जिंतूर-येलदरी मार्गावरील खड्ड्यांविरोधात नागरिकांनी आंदोलन केल्याची नोंद ही झाली आहे. जिंतूर तालुक्यातील सर्व प्रमुख मार्गांचे अपघात ऑडिट करून अपघातप्रवण ठिकाणे निश्चित करावीत, आवश्यक त्या ठिकाणी गतिरोधक, रिफ्लेक्टर, दिशादर्शक फलक, स्ट्रीट लाईट आणि रस्त्याची दुरुस्ती करावी. तसेच पोलिस प्रशासनाने अल्पवयीन वाहनचालक, ट्रिपल सीट, हेल्मेट आणि वेगाविरोधात नियमित कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

### रात्रीचा अनावश्यक दुचाकी प्रवास टाळा

विशेषतः ग्रामीण भागातील तरुणांनी रात्रीच्या वेळी विनाकारण दुचाकीवरून लांबचा प्रवास टाळावा. कुटुंबासोबत प्रवास करताना शक्य असल्यास सुरक्षित चारचाकी वाहनाचा पर्याय निवडावा. दुचाकीवर ट्रिपल सीट प्रवास करू नये, हेल्मेट वापरावे, वेगावर नियंत्रण ठेवावे आणि मोबाईलचा वापर वाहन चालवताना करू नये.एक अपघात केवळ एका व्यक्तीचा जीव घेत नाही; संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त करू शकतो. त्याम ुळे रस्ता सुरक्षित तर जीवन सुरक्षित हा संदेश केवळ घोषवाक्य न राहता जिंतूर तालुक्यात प्रत्येक कुटुंबाने आचरणात आणण्याची गरज आहे.

# थोडक्यात बातम्या

## पनवेल येथील सारनाथ बुद्धविहारात महापुरुषांची जयंती साजरी



**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.१८, पनवेल (नवी मुंबई) :** विचुंबे येथील सारनाथ बुद्ध विहारात अनागारिक धम्मपाल, पेरियार ई. व्ही. रामास्वामी आणि यशवंत भीमराव आंबेडकर या तीन म हापुरुषांची जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून तिन्ही महापुरुषांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि बौद्ध धम्माच्या प्रसारासाठी केलेल्या कार्याची माहिती उपस्थितांना देण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला तीनही महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या मार्गदर्शनातून अनागारिक धम्मपाल, पेरियार रामास्वामी आणि यशवंत भीमराव आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला.अनागारिक धम्मपाल यांनी बौद्ध धम्माच्या पुनरुज्जीवनासाठी आणि त्याच्या प्रसारासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. भारतातील बौद्ध वारशाशी संबंधित स्थळांच्या संवर्धनासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची माहिती यावेळी देण्यात आली. बौद्ध धम्मातील मानवतावादी मूल्ये आणि त्यांचा समाजावर होणारा परिणाम याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. पेरियार ई.व्ही. रामास्वामी यांनी सामाजिक विषमता, जातिभेद आणि अंधश्रद्धेविरोधात जनजागृतीचे कार्य केले. त्यांनी सामाजिक समानता, स्वाभिमान आणि तर्कनिष्ठ विचारसरणीचा पुरस्कार केला. त्यांच्या सामाजिक चळवळीतील योगदानाची माहिती उपस्थितांना देण्यात आली.तसेच यशवंत भीमराव आंबेडकर यांच्या सामाजिक आणि धम्मविषयक कार्याचीही माहिती देण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आणि बौद्ध धम्माच्या प्रसाराचा वारसा पुढे नेण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा उल्लेख यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमा दरम्यान तीनही महापुरुषांच्या कार्याशी संबंधित विविध पैलूंवर प्रवचन देण्यात आले. त्यांच्या विचारांचा आजच्या पिढीने अभ्यास करून सामाजिक समता, बंधुता, शिक्षण आणि मानवतावादी मूल्ये अंगीकारण्याची गरज असल्याचे वक्त्यांनी सांगितले.या जयंती कार्यक्रमाला सारनाथ बुद्ध विहाराचे आजी-माजी सदस्य, पदाधिकारी, माजी शिक्षक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी महापुरुषांच्या कार्याला अभिवादन करत त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाच्या निमित्ताने सारनाथ बुद्ध विहारात महापुरुषांच्या विचारांचे स्मरण आणि सामाजिक प्रबोधनाचे वातावरण निर्माण झाले. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या या तीन व्यक्तिमत्त्वांच्या जयंतीचे एकत्रित आयोजन केल्याने त्यांच्या कार्याचा व्यापक परिचय उपस्थितांना करून देण्याची संधी मिळाली.

## निवोशी-भेलेवाडीत २ महिन्यांपासून अंधाराचे साम्राज्य; गणेशोत्सवातही स्ट्रीट लाईट बंद



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१८, निवोशी (गुहागर) :** पालशेत-निवोशी ग्रामपंचायत महसूल क्षेत्रातील निवोशी-भेलेवाडी विभागात गेली दोन महिने स्ट्रीट लाईट बंद असल्याने ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत आहे. ऐन गणेशोत्सवातही स्ट्रीट लाईट सुरू न झाल्याने संपूर्ण परिसर अंधारात बुडाला आहे.

निवोशी गावातील अनेक वाड्या अतिदुर्गम जंगल भागात आहेत. त्यामुळे अंधारात वन्य प्राणी, सर्प आणि विंचू यांच्या धोक्याला ग्रामस्थांना सामोरे जावे लागत आहे. गौरी-गणपती सणानिमित्त आरती, जाखडी नाच, भजन आणि दर्शनासाठी ये-जा करणाऱ्या ग्रामस्थांना अंधारातून वाट काढावी लागत असल्याने सणाच्या आनंदावर विरजण पडले आहे. याबाबत ग्रामपंचायत प्रशासन आणि संबंधित यंत्रणेविरोधात ग्रामस्थांनी तीव्र संताप व नाराजी व्यक्त केली आहे. स्ट्रीट लाईट तातडीने दुरुस्त करून प्रकाश व्यवस्था पूर्ववत करावी, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

## बँक ऑफ इंडिया केळशी शाखे तर्फे दक्षता जनजागृती अभियान






**अक्षराज : कृष्णा श्रावणपाटील**

**दि.१८, दापोली (रत्नागिरी) :** बँक ऑफ इंडियाच्या वतीने भ्रष्टाचाराला प्रतिबंध करण्यासाठी तसेच प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि नैतिक मूल्यांविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सत्यनिष्ठा से समृद्धि – Probity for Prosperity या संकल्पनेवर आधारित यावर्षीचा दक्षता जनजागृती सप्ताह २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. यानिमित्त बँकेच्या शाखांमध्ये विविध जनजागृतीपर उपक्रम, मार्गदर्शन व माहितीपर कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.

याशिवाय १७ ऑगस्ट ते १६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत तीन महिन्यांचे दक्षता जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानातून भ्रष्टाचारमुक्त आणि पारदर्शक कार्यप्रणालीचे महत्त्व नागरिक तसेच बँक ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. आपण जपलेली मूल्येच आपल्या भविष्यातील प्रगतीचा पाया आहेत, या संदेशातून प्रामाणिकपणा व सत्यनिष्ठेची मूल्ये अंगीकारण्याचे आवाहन बँक ऑफ इंडियाच्या वतीने करण्यात आले आहे.

## थोडक्यात बातम्या

### पिंपरी खुर्द शेत शिवारात आढळला ७ फुटी अजगर



**अक्षराज : अलीम शेख**

**दि.१८, परभणी :** पिंपरी येथे शेतात काम करत असताना शेतकऱ्यांच्या पाया जवळ ७ फुटी अजगर आल्याची धकादायक घटना दिनांक १८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या च्या सुमारास घडली. याबाबत सविस्तर माहिती अशी की शेतात काम करताना अजगर जवळ आल्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या जवळ असलेल्या शेतकरी बांधवांनी घटना स्थली धाव घेत शेतकऱ्यांचा जीव वाचवला, सध्या बऱ्याच दिवसापासून पावसाचा खंड असल्यामुळे जमिनीमध्ये उष्णता निर्माण झाली होती. मात्र आज सकाळी मुसळधार पावसाने जमिनीमध्ये ओलावा निर्माण झाला. त्यामुळे विषारी प्राणी जमिनी बाहेर येत असल्याने आज पिंपरी शिवारात ७ फुटी अजगर आढळून आला. या घटनेमुळे आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या मनामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आर. सी. पटेल विद्यालयात उत्साहात वृक्षारोपण



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.१८, शिरपूर (धुळे) :** शिरपूर तालुक्यातील आर. सी. पटेल उच्च माध्यमिक विद्यालयात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विशेष वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'झाडे लावा, झाडे जगवा' या मुख्य संदेशासह हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला विद्यालयाचे प्राचार्य सी. एन. पाटील तसेच 'वृक्ष मित्र' पुरस्कार प्राप्त गावातील प्रतिष्ठित नागरिक शिवाजी राजपूत यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याशिवाय विद्यालयाचे पर्यवेक्षक एस. डी. पाटील, एन.एस.एस. कार्यक्रम प्रमुख एस. एम. पाटील आणि सहप्रमुख व्ही. एस. ईशी व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून झाली. याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना वृक्षांचे मानवी जीवनातील व पर्यावरणातील महत्त्व पटवून दिले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी केवळ वृक्षारोपण करून थांब चालणार नाही, तर लावलेली झाडे जगवणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे, असा संदेश त्यांनी आपल्या भाषणातून दिला. 'वृक्ष मित्र' शिवाजी राजपूत यांनीही विद्यार्थ्यांना निसर्ग संवर्धनाचे महत्त्व सांगून अधिकाधिक झाडे लावण्याचे आवाहन केले. या उपक्रमात विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन वृक्ष संवर्धनाची शपथ घेतली.

## चारठाण्यात गोकुळेश्वर बारवेत १००१ दिव्यांची आरास



### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्यासाठी मनोकामना

**अक्षराज : अलीम शेख**

**दि.१८, परभणी :** राज्य मंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत चारठाणा येथे विविध उपक्रम राबविण्यात आले. या अभियानांतर्गत चारठाणा येथील ऐतिहासिक गोकुळेश्वर बारवेत १००१ आशीर्वादाचे दिवे प्रज्वलित करण्यात आले.

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि निरंतर ऊर्जावान जीवन लाभावे, यासाठी उपस्थितांनी मनोकामना केली.

१००१ दिव्यांनी उजळून निघालेली गोकुळेश्वर बारव पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. दिव्यांच्या रोषणाईमुळे संपूर्ण बारव परिसरात भक्तिमय व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमास पंचायत समिती सभापती किशोर खिस्ते, जिल्हा परिषद सदस्य भगवानराव वाटाणे, चारठाणा मंडळ अध्यक्ष गोविंदराव थिटे, भाजप नेते नानासाहेब राऊत, पंचायत समिती सदस्य तहेसीन देशमुख, सुनीलराव भोंबे, गंगाधर आप्पा तरटे, सुनीलराव मते, सरपंच अनिरुद्ध चव्हाण, उपसरपंच वाजेद कुरेशी यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, विविध पदाधिकारी, गोकुळेश्वर गणेश मित्र मंडळ व समता गणेश मित्र मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चारठाण्यात पाणीटंचाईच्या काळात पाशाभाई कुरेशी यांचा माणुसकीचा हात



### वॉर्ड क्रमांक १ व २ मधील नागरिकांना घरच्या बोअरमधून पाणी

**अक्षराज : अलीम शेख**

**दि.१८, चारठाणा (परभणी) :** कमी पावसामुळे चारठाणा परिसरात पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. अशा परिस्थितीत चारठाण्याचे सुपुत्र पाशाभाई कुरेशी यांनी पुढाकार घेत स्वतःच्या घरातील बोअरवेलमधून वॉर्ड क्रमांक १ व २ मधील नागरिकांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्याचे पवित्र आणि सामाजिक बांधिलकीचे काम सुरू केले आहे. पावसाचे प्रमाण कमी झाल्याने परिसरातील विहिरी, बोअरवेल तसेच इतर पाण्याचे स्रोत आटत चालले आहेत. त्यामुळे अनेक कुटुंबांसमोर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः वयोवृद्ध, महिला आणि लहान मुलांना पाण्यासाठी दूरवर जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर पाशाभाई कुरेशी यांनी कोणताही स्वार्थ न ठेवता आपल्या घरातील बोअरचे पाणी नागरिकांसाठी उपलब्ध करून दिल्याने परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

'संकटाच्या काळात नागरिकांच्या उपयोगी पडणे हीच खरी समाजसेवा' या भावनेतून पाशाभाई कुरेशी यांनी हा उपक्रम सुरू केल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले. त्यांच्या या सामाजिक कार्याचे नागरिकांकडूनही कौतुक होत असून, पाणीटंचाईच्या काळात त्यांनी घेतलेला पुढाकार इतरांसाठी ही प्रेरणादायी ठरत आहे.

या सामाजिक कार्याची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या वतीने पाशाभाई कुरेशी यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थितांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करून भविष्यातही अशाच प्रकारे समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. यावेळी सलीम भाई काझी, मुबारक हाफेसाब, माजेद देशमुख, गब्बर भाई इनामदार, रोशन भाई इनामदार, आकील कुरेशी, शेख बाबाभाई, फिरोज पठाण, मोशीन इनामदार, शेख वसीम, सलीम कुरेशी, नानासाहेब निकाळजे आदी मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वीज पडून शेतकऱ्याचा मृत्यू; पत्नी गंभीर जखमी



**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**

**दि.१८, पोंभूर्णा (चंद्रपूर) :** पोंभूर्णा तालुक्यातील चेकठाणेवासना येथे शेतातील काम आटोपून घरी परतत असताना अचानक अंगावर वीज कोसळल्याने एका ५५ वर्षीय शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांची पत्नी गंभीर जखमी झाली आहे.

चेकठाणे वासना येथील केशव डोनु गुडी (वय ५५ वर्षे) आणि त्यांची पत्नी वैशाली केशव गुडी (वय ४५ वर्षे) असे दांपत्य नेहमीप्रमाणे आपल्या शेतात कामानिमित्त गेले होते. दिवसभराचे काम आटोपून दोघेही संध्याकाळी घरी परतत असताना, वाटेत ऋषी आलाम यांच्या शेताजवळ अचानक हवामान बदलून वीज कोसळली. या अंगावर वीज पडण्याच्या तीव्र झटक्यात केशव गुडी यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांच्या पत्नी वैशाली गुडी या गंभीर जखमी झाल्या.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी तात्काळ मदत करत जखमी वैशाली गुडी यांना उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, पोंभूर्णा येथे दाखल केले. परंतू, प्रकृती अधिक चिंताजनक असल्याने प्राथमिक उपचारानंतर त्यांना तातडीने पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर येथे हलविण्यात आले आहे.

या अचानक झालेल्या दुर्घटनेमुळे चेकठाणेवासना गावावर शोककळा पसरली असून, गुडी कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. प्रशासनाने घटनेची नोंद घेऊन मृत शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना शासनाच्या नियमानुसार तातडीने मदत व नुकसानभरपाई उपलब्ध करुन द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

**वीज पडून गुराखी ठार**

मूल तालुक्यातील उसराळा या गावातील गुरे राखणाऱ्या एका गुराख्याचा वीज पडून मृत्यू झाल्याची घटना दि.१७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास घडली. मूल तालुक्यात सुसाट वारा आणि मोठ्या मेघ गर्जनेसह पाऊस आला यात मूल येथून अंदाजे ८- ९ किमी.

अंतरावर असलेल्या उसराळा या गावातील शेळ्या चारायला गेलेला गुराखी दीपक नारायण मडावी (३५) यांच्या अंगावर वीज पडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने गावात मोठी हळहळ व्यक्त केल्या जात आहे.

घटनेची माहिती मिळताच मूल पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरु आहे.

## चंद्रपूर जिल्हा बँकेतर्फे १९ सप्टेंबरपासून भव्य सहकार सप्ताह




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** सहकार क्षेत्राच्या विकासासाठी संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे सहकार महर्षी कै. ॲड. बाबासाहेब वासाडे यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दि. १९ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर ' भव्य सहकार सप्ताहा' चे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष रविंद्र शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या भव्य सहकार सप्ताहाचा मुख्य कार्यक्रम १९ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता मा. सा. कन्नमवार सभागृह, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, चंद्रपूर येथे आयोजित करण्यात आला असून यावेळी कै. ॲड. बाबासाहेब वासाडे यांच्या अर्धांगिनी वैशाली वासाडे, माजी जिल्हा परिषद अध्यंक्ष, जि. प. चंद्रपूर यांचा तसेच सहकार महर्षी कै. ॲड. बाबासाहेब वासाडे यांचे सहकार चळवळीतील सहकारी यांचा सुध्दा यावेळी सन्मान चिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे तसेच कर्ज वितरण सोहळा पार पडणार असल्याची माहिती यावेळी अध्यक्ष शिंदे यांनी दिली.

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्व शाखा स्तरावर व विभागीय स्तरावर १९ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२६ पर्यंत सहकार सप्ताह मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा क्षेत्राच्या खासदार तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालिका प्रतिभा धानोरकर राहणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार बंटी उर्फ कीर्तीकुमार भांगडीया यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाला राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे माजी अध्यक्ष हंसराज अहीर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून, माजी मंत्री शोभाताई फडणवीस मार्गदर्शन करणार आहेत. आ. सुधीर मुनगंटीवार, आ. किशोर जोरगेवार, आ. करण देवतळे, आ. देवराव भोंगळे, आ. सुधाकर अडबाले, विदर्भवादी ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे, तसेच प्रसिध्द उद्योजक चंद्रकांत वासाडे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष रविंद्र श्रीनिवासराव शिंदे, उपाध्यक्ष संजय डोंगरे, मानद सचिव अवेश खान पठाण, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश्वर भि. कल्याणकर तसेच बँकेचे समस्त संचालक मंडळ यांच्या पुढाकाराने या सहकार सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सहकार महर्षी का. बाबासाहेब वासाडे यांच्या कार्याचा गौरव आणि सहकार चळवळीला अधिक व्यापक करण्याच्या उद्देशाने आयोजित या सप्ताहाला सहकार क्षेत्रातील सर्व संस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी, कर्मचारी, सभासद, ग्राहक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा बँकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## चंद्रपूर भाजप महानगर कार्यालयात आ.जोरगेवार यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने दिनांक १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान'राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत विविध सेवाभावी आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून,त्याचाच एक भाग म्हणून गुरुवारी चंद्रपूर येथील भारतीय जनता पार्टी महानगर कार्यालयात'आशीर्वादाचा दिवा'हा उपक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी आ.किशोर जोरगेवार यांच्यासहउपाध्यक्ष बलराम डोडानी, महामंत्री रवींद्र गुरनुले, सविता दंढारे, ॲड. सुरेश तालेवार, प्रिन्स प्रसाद, अक्षय शेंडे, कौसर खान, नीलिमा वनकर, लता ब्राह्मणे, सोनाली इटनकर, रिना साखरकर,भावना बारसागडे, सपना सातपुते, सविता ब्राह्मणे, मीनाक्षी उपगन्लावार, छाया चवरे आदींची उपस्थिती होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २५ वर्षांच्या निष्ठावान जनसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तसेच जनतेच्या आशीर्वादाची सामूहिक अभिव्यक्ती करण्याच्या उद्देशाने'आशीर्वाद का दिया'हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून देशसेवेसाठी समर्पित असलेल्या नेतृत्वाप्रती कृतज्ञता आणि सद्भावना व्यक्त करण्यात आली.सायंकाळी ७ वाजता या उपक्रमाला सुरुवात झाली. भाजप पदाधिकारी,कार्यकर्ते आणि नागरिकांनी आपल्या घरांमध्ये दीप प्रज्वलित करून या अभियानात सहभाग नोंदविला. चंद्रपूर महानगर कार्यालयातही दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी दीप प्रज्वलित करून उपक्रमात सहभाग घेतला.

यावेळी आ. किशोर जोरगेवार म्हणाले की,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या सार्वजनिक जीवनातील प्रदीर्घ काळ देशसेवेला समर्पित केला आहे. त्यांच्या कार्याला जनतेचा आशीर्वाद आणि शुभेच्छा मिळाव्यात, या भावनेतून'आशीर्वादाचा दिवा'उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. सेवा,समर्पण आणि राष्ट्रहिताच्या भावनेतून सुरू असलेल्या या अभियानात समाजातील प्रत्येक घटकाने सहभागी व्हावे,असे आवाहन त्यांनी केले.

'सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून आगामी महिनाभर विविध सामाजिक,सेवाभावी आणि जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जनसेवेचा संकल्प अधिक दृढ करण्यासोबतच समाजातील विविध घटकांपर्यंत सेवाकार्य पोहोचविण्याचा प्रयत्न या अभियानातून केला जाणार असल्याचे ते यावेळी म्हणाले.